# निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा महाराष्ट्र - कर्नाटक सीमावाद

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनाने सीमावर्ती भागातील गावांमध्ये वैद्यकीय सुविधा आरोग्य विमा योजना राबवण्याची घोषणा केली असताना लगेचच कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी महाराष्ट्रद्वेषी भूमिकेचे दर्शन घडवले आहे. महाराष्ट्राच्या सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या राज्यात प्रवेश करू नये, असा इशारा त्यांनी दिला आहे. एका सकारात्मक विषयावरूनही वाद आणखी तापत असल्याचे दिसत आहे. आगामी निवडणुकीच्या तोंडावर सीमा वाद महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सत्ताधाऱ्यांसाठी फायदेशीरच ठरणार आहे.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नासाठी गेली सहा दशकांहून अधिक काळ संघर्ष सुरू आहे. बेळगावसह सीमाभागातील ८६५ गावे महाराष्ट्रामध्ये सामील व्हावीत यासाठी मराठी भाषिक प्राणपणाने संघर्ष करीत आहे. या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरू असताना कर्नाटक राज्य सरकारची मराठी भाषकांवरील दडपशाही सुरुच आहे.

एका विधायक प्रश्नावरूनही कर्नाटक सरकारची आठमुठी भूमिका पुन्हा एकदा पुढे आली आहे. महाराष्ट्र शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ सीमाभागातील मराठीबहुल ८६५ गावांमध्ये राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शिंदे सेनेचे खासदार,महाराष्ट्र सीमा समन्वय समितीचे अध्यक्ष धैर्यशील माने व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी या महिन्याच्या सुरुवातीला बेळगाव येथे महाराष्ट्र शासनाची भूमिका मांडून आरोग्यसेवा पुस्तिकेचे वितरण महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केले.

त्यानंतर लगेचच कर्नाटक शासनाला महाराष्ट्रद्वेषाची उबळ आली. बेळगाव येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री के. सिद्धरामय्या यांनी महाराष्ट्राने कर्नाटक कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू नये. आमच्या राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत महाराष्ट्र सरकारला कळवले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकात आपल्या कोणत्याही योजना आणू नयेत, असा इशारा दिला. कर्नाटक शासन राज्यातील जनतेच्या आरोग्य सेवा करण्यास महाराष्ट्रापेक्षा समर्थ असताना महाराष्ट्राने आमच्या राज्यात नसती लुडबुड करू नये, असे त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होता.

महाराष्ट्राच्या चुकीवर बोट

दुसरीकडे महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेवर महाराष्ट्र आणि सीमाभाग या दोन्हीकडून प्रश्नचिन्ह लावल्याचेही दिसून आले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ राज्यात अनेक ठिकाणी मिळत नसल्याचे चित्र आहे. कर्नाटकात जाण्यापेक्षा राज्य शासनाने महाराष्ट्रातील आरोग्य सेवा सुधारण्याकडे लक्ष दिले पाहिजे, असा घरचा आहेर देतानाच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी केलेले वक्तव्य चुकीचे नाही असे म्हणत सिद्धरामय्या यांची पाठराखण केली आहे. सीमाभागातूनही महाराष्ट्र शासनाच्या निष्क्रिय भूमिकेवर दुगाण्या झाडण्यात आल्या आहेत. सीमाभागावर महाराष्ट्राचा नैसर्गिक मालकी हक्क आहे. सीमाभागावर महाराष्ट्राचा मालकी हक्क आहे. कर्नाटक हे भाडोत्री आहेत. असे असतानाही महाराष्ट्र शासन आपला हक्क सांगण्यासाठी ठोस पावले उचलत नाही हि सीमावासियांच्या मोठी खंत आहे. सीमाभागात मराठी भाषकांवर दडपशाही अन्याय होत असताना महाराष्ट्र शासन, समन्वय मंत्री, सीमा समन्वय समितीचे अध्यक्ष असे सारेजण बघ्याची भूमिका घेत आहेत. महाराष्ट्र शासनाची ही निष्क्रियता लक्षात घेऊन सिद्धरामय्या यांनी हे विधान केले आहे. त्याचा आम्ही निषेध करतो. तथापि सिद्धरामय्या यांनी उघडपणे आव्हान दिले असताना महाराष्ट्रातून कोणी काहीच का बोलत नाही, असा जळजळीत प्रश्न महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगळे यांनी उपस्थित केला आहे.




### सिद्धरामय्यांवर टीका

**महाराष्ट्र शासनाच्या विधायक भूमिकेवरही कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी वाकड्यात शिरण्याची भूमिका घेतल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. शिंदे सेनेचे कोल्हापूर जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्र प्रमाणे सीमाभागातील उदात्त हेतूने वैद्यकीय सेवा देण्यासाठी कार्यरत असताना सिद्धरामया यांनी घेतलेली भूमिका चुकीची आहे. महाराष्ट्र शासनाचा हेतू समजून घेऊन कर्नाटक शासनाने सहकार्य करणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ठाकरे सेनेचे कोल्हापूर जिल्हाप्रमुख संजय पवार यांनी मराठी बांधवांबाबत कर्नाटकची भूमिका नेहमीच विरोधाची राहिली आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विधानातून पुन्हा तेच दिसून आले आहे. तथापि, महाराष्ट्रात कन्नड पाट्या खुलेआम लावल्या जात असताना महाराष्ट्र शासनाने जशास तशी भूमिका घेऊन कर्नाटकला उत्तर देणे गरजेचे आहे,याची जाणीव करून दिली आहे.**

### फायदा कोणाला ?

**कर्नाटक सरकारने महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतल्याने सीमा भागात कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेसला त्याचा फायदा होऊ शकतो. कारण सीमा भागात हा प्रश्न चिघळल्यास त्याचा सत्ताधारी पक्षाला फायदा होतो. सीमा भागातील मराठी भाषकांमध्ये कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या विरोधात भावना तीव्र आहेत. याचा फायदा राज्यात महायुतीला होऊ शकतो.**

### एक पाऊल पुढे

**महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा प्रसार करण्यासाठी बेळगाव मध्ये गेलेले खासदार धैर्यशील माने यांनी महाराष्ट्र शासनाने सीमाभागातील केवळ मराठी भाषिकच नव्हे तर सर्व भाषकांसाठी महात्मा फुले आरोग्य योजना राबवण्याची भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र शासनाची सकारात्मक आणि व्यापक भूमिका पाहता कर्नाटक शासनाने संकुचित दृष्टिकोनातून न पाहता घेता सहकार्य करणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हा सारा ताजा गोंधळ पाहता राजकीय पातळीवर सुरू असलेला महाराष्ट्र -कर्नाटक संघर्ष पुढे राहणार असला तरी किमान आरोग्य विषयक जीवन मरणाचा प्रश्न असलेल्या बाबतीत कर्नाटक शासनाने सकारात्मक भूमिका घेणे गरजेचे आहे, अशी मराठी भाषकांची भावना आहे.**

# निसर्गाचे संरक्षण करणारे शाश्वत बांधकाम करण्याची गरज : शिवप्रसाद ओझा

## शिरोळात इंजिनिअर्स अँड आर्किटेक्टस् असोसिएशनचे मार्गदर्शन चर्चासत्र

शिरोळ : इंजिनिअर्स आणि आर्किटेक्टस् यांनी सकारात्मक विचार करून वर्तमान व भविष्य या दोन्हीच्या गरजा लक्षात घेऊन निसर्गाला संरक्षण देणारे शाश्वत बांधकाम उभा करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन इचलकरंजी येथील प्रसिद्ध आर्किटेक्ट शिवप्रसाद ओझा यांनी केले

शिरोळ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्टस् असोसिएशनच्या वतीने मार्गदर्शन चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते यावेळी टिकाऊ व भविष्याचा वेध घेणारे वास्तुशास्त्र या विषयावर शिवप्रसाद ओझा यांचे मार्गदर्शन झाले असोसिएशनचे अध्यक्ष नितीन शेट्टी यांनी स्वागत केले रणजीत माने यांनी प्रास्ताविक केले इंजिनिअर धनंजय मुळीक व श्रेयस लडगे यांची भरत अर्बन बँकेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला

यावेळी बोलताना ओझा पुढे म्हणाले की एखादे काम सुरू करत असताना सदर कामात मालकाची असणारी गरज समजून घेणे आवश्यक आहे तसेच काम करण्यात येणाऱ्या त्या जागेची पाहणी करून जागेच्या भौगोलिक परिस्थितीनुसार बांधकामाचा आराखडा तयार करावा वर्तमान व भविष्यात बदलणाऱ्या परिस्थितीचा विचार करून निसर्गाचे संरक्षण कसे करता येईल याकडे लक्ष देऊन शाश्वत आणि रचनात्मक वास्तू उभा कराव्यात यासाठी आपला नेहमी सकारात्मक दृष्टिकोन असावा असे सांगितले

आयकॉन स्टीलचे टेक्निकल हेड अमोल नाईक यांनी स्टील संदर्भात माहिती दिली यावेळी मार्केटिंग प्रतिनिधी विजय पाटील तुषार पाटील आयकॉन स्टीलचे विक्रेते आनंदराव माने - देशमुख इंजिनिअर्स अँड आर्किटेक्टस् असोसिएशनचे उपाध्यक्ष सुजित पाटील खजिनदार लक्ष्मण भोसले रामप्रसाद पाटील बाळासाहेब शेट्टी अजय पाटील वैभव माने विनोद मुळीक सुमित देसाई वैभव काळे दादासो माने - देशमुख विवेकानंद मुळीक गणेश चुडमुंगे शुभम शेट्टी नितीन पाटील अक्षय पाटील विनायक बनके अभिजीत माळी शुभम नाईक अनिरुद्ध कांबळे आकाश फल्ले अजिंक्य भोसले रोहित माळकर वैभव शिंदे रणजीत पाटील संतोष कोल्हापुरे सुमित शेट्टी ओंकार कदम गणेश आरगे अजिंक्य पाटील प्रथमेश पाटील नितीन माने बापू कांबळे सुशांत

# जलसागरचा मासा पाटबंधारे विभागाच्या नरड्यात बसला रुतून, कारवाईसाठी आंदोलन

**सातारा :** सातारा- मेढा रस्त्यावरील गोगावले वाडी येथील जलसागर हॉटेल व येथील आंबळी लोकप्रिय आहे. यावर ताव मारण्यासाठी अनेक जण जातात. पण ,सध्या सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी जलसागर हॉटेलचे अतिक्रमण दूर करण्यासाठी सारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केल्यामुळे पाटबंधारे विभाग व संबंधितांना आता माशाचा काटा चांगला रुतू लागल्याचे दिसून येत आहे.

. खरं म्हणजे कण्हेर धरणाच्या निर्मितीमुळे जलसंपदा तथा पाटबंधारे विभागाच्या ताब्यात असलेली ही जमीन हॉटेल उद्योजक व जलसागर चे मालक अरुण कापसे यांना भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. परंतु ,आता ही जमीन परत न देता त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आलेले आहे. सुरुवातीला ५५ चौरस फुटाची खानावळ होती. आज त्याचा एवढा विस्तार झालेला आहे की, आता कण्हेर धरण सुद्धा ताब्यात घेतले तर आश्चर्य वाटणार नाही. कारण, मांजर दूध पिताना डोळे मिटत असली तरी इतरांचे डोळे उघडे असतात. त्यामुळेच तर सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांच्या आंदोलनामुळे पाटबंधारे विभागाला आता जाग आलेली आहे.

अनेकदा या विभागाचे अधिकारी व स्वतःला पुढारी समजणारे अनेक नामांकित व्यक्ती माशावर तव मारत होते. आता हाच मासा सुशांत मोरे यांच्या आंदोलनामुळे काहींच्या नरड्यातरुतून बसला असल्याचा भास निर्माण झालेला आहे.सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक आंदोलन होतात पण सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांच्या आंदोलनाला चांगले यश मिळते. त्यामुळे जल सागरची मेहरबानी व पाटबंधारे विभागाची जागा आता मोकळी सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे हे स्वस्त बसणार नाहीत अशी आता धारणा सातारा जिल्ह्यातील न्यायाची मागणी करणाऱ्या व्यक्तींकडून होत आहे.सद्या न्याय प्रविष्ट बाब असली तरी पाटबंधारे विभागावर अन्याय होऊ नये . अशीच भावना निर्माण झालेली आहे.

याबाबत पाटबंधारे विभागाने प्रचलित धोरणानुसार कागदी घोडे नाचून शासनाचीच घोर फसवणूक केली आहे का याचीही तपासणी होणे गरजेचे आहे कारण,मौजे - गोगावलेवाडी ता.जि. सातारा यांना सातारा मेढा रस्त्याच्या उजव्या बाजूस असलेल्या जलसंपदा विभागाचे जागा खाणावळ व्यवसाया करीता ५५ चौ.मी. श्री.अरूण बाजीराव कापसे यांना सन २००५ ते २०१०

पर्यंत भाडेतत्वावर देणेत आलेली होती. तद्नंतर श्री. कापसे यांना सदरचे जागेबाबत कोणतीही मुदतवाढ जलसंपदा विभागा मार्फत देणेत आलेली नाही. या खाणावळ व्यवसाय करणे करिता देण्यात आलेली जागा रिकामी करणे बाबत श्री.कापसे यांना वेळोवेळी नोटीस बजावणेत आलेल्या आहेत. श्री. कापसे यांनी सदरचे अनधिकृत खाणावळ व्यवसाय काढणेत येवू नये म्हणून सातारा येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मू ४५१/२०२१ नूसार दावा दाखल केला आहे.

तरीही जलसागर हॉटेलला जलसमाधी मिळत नाही या पाठीमागे कोणते अधिकारी व लोकप्रतिनिधीचा हात आहे हे न सोबत द्यायची सातारा तालुक्यातील जनता खुळी नाही पण पैशाची भांडण पैशानेच मिळतात याची एकदा पुन्हा एकदा खात्री पटल्यामुळे जलसागरचा विस्तार हा आता न्यायालयाला बी आव्हान देऊन त्यावर अन्यायाची बोट चालवेल का? हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

दरम्यान या जनसागर हॉटेलच्या अतिक्रमणाबाबत न्यायालयाने जनतेचे हित पहावे व तातडीने निर्णय घ्यावा. जलसागर हॉटेलचे अतिक्रमण म्हणजे कोणत्याही जातीचे आरक्षणाचा प्रश्न नाही तर हा प्रश्न भाडेतत्त्वावर आणखीन किती जमीनचा वापर करायचा ? याचाच असल्याचे सिद्ध होत आहे.

# पाटण विधानसभा मतदारसंघात १२ हजार नवमतदारांची नोंदणी

## मयत व दुबार अशी एकूण १३ हजार ८०० मतदारांची नावे कमी

**पाटण :** तालुका दुर्गम व डोंगराळ असूनही पाटण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी शुध्दीकरणाचे काम चांगले झाले आहे. आजपर्यंत १८ ते १९ वयोगटातील मतदारांची नाव नोंदणी मोठ्या प्रमाणात झाली असून काही दुबार व मयत नावेही मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आली आहेत. अजूनही राहिलेल्या नवमतदार व विवाहित महिलांनी आपली नावे मतदार यादीत नोंद करावीत. मतदार याद्या दि. २३ जानेवारीपासून स्थानिक बीएलओ यांच्यामार्फत प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. याबाबत काही हरकती असल्यास संबंधित अधिकारी अथवा बीएलओंकडे सादर कराव्यात, असे आवाहन प्रांताधिकारी सुनील गाडे यांनी पत्रकार परिषदेत केले.

येथील तहसीलदार कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नायब तहसीलदार ए. ए. मुलाणी उपस्थित होते.

प्रांताधिकारी गाडे म्हणाले, पाटण विधानसभा मतदारसंघात नवीन मतदान नोंदणीचे सर्वाधिक काम झाले असून यामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५ हजार ८६२ मतदारांसह एकूण १२ हजार ६६१ इतक्या नवीन मतदारांची नाव नोंदणी करण्यात आली आहे तर मयत व दुबार असे एकूण १३ हजार ८०० मतदारांची नावे कमी करण्यात आली आहेत. तालुक्यात १ लाख ५१ हजार ६१४ पुरुष मतदार व १ लाख ४७ हजार ९६ स्त्री असे एकूण २ लाख ९८ हजार ७१० मतदार आहेत. हजारी पुरुषामागे ९२९ इतकी महिलांची संख्या आहे. मात्र अद्यापही ३ हजारच्या आसपास नवीन मतदार अजूनही नोंदणीसाठी पुढे येत नसल्याचे चित्र आहे. याबाबत अंगणवाडी सेविका, महसूल कर्मचाऱ्यांमार्फत जनजागृती सुरू आहे. तालुक्यातील अनेक विद्यार्थी शिक्षणानिमित परगावी असल्याने त्यांची नावे अजून मतदार यादीत नोंदविण्यात आली नसल्याचे आढळून आले आहे. याशिवाय नवीन लग्न झालेल्या विवाहित मुलींची नावे देखील अजून पाहिजे त्या प्रमाणात नोंदविलेली नाहीत. अशा नवविवाहित मुलींनी आपली नावे सासरच्या ठिकाणी नोंदवावीत. त्याचबरोबर तालुक्यातील बाहेर असणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची नावे आजपर्यंत स्थानिक गावातील मतदार यादीत तशीच होती. याबाबत आपण तहसीलदार रमेश पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांसोबत त्या-त्या गावात जावून त्यांच्या सहमतीने ती नावे कमी केली आहेत. ही कामे करत असताना तालुक्यातील सर्व पक्षाचे पदाधिकारी यांच्या बैठका घेवून मयत व स्थलांतरित झालेल्या विवाहित मुलींची नावे कमी करताना सर्वांनी विश्वासात घेवून कामे केली आहेत.

पाटण तालुका हा दुर्गम व डोंगराळ असतानाही अंगणवाडी सेविका, तलाठी, मंडलाधिकारी, महसूल कर्मचारी, निवडणूक शाखेतील कर्मचारी यांनी चांगले काम केले आहे. तालुक्यात मतदार यादी शुध्दीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात झाले आहे.

# महाधन क्रॉपटेकच्या सहाय्याने कांदा उत्पादनात १५ ते २० टक्क्यांनी वाढ

**सातारा :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी, कांदा हे रब्बी हंगामातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. जागतिक स्तरावरील उत्पादकता आणि भारतातील उत्पादकता पाहता मोठी तफावत दिसते. कांद्याच्या उत्पादनखर्चात झालेली वाढ, अवकाळी पाऊस व बाजारातील चढउतार यामुळे शेतकरी अधिकच हैराण झाला आहे. नावीन्यपर्ण कृषी तंत्राचा वापर करण्यासाठी पुढे येणे व त्याद्वारे खर्चात बचत करून उत्पादन व गुणवत्ता यांच्यात खात्रीने वाढ करणे हाच यातून सुटकेचा मार्ग आहे. अलीकडेच बाजारात आणलेले 'महाधन क्रॉपटेक' खत म्हणजे कांद्याचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले आहे.



गेल्या दोन हंगामापासून ज्या ज्या शेतकऱ्यांनी महाधन क्रॉपटेकचा वापर केला त्यांच्या कांद्याच्या उत्पादनात सरासरी १५ ते २०% ने वाढ दिसून आली आहे. 'महाधन क्रॉपटेक हे कांद्याच्या पिकासाठी असलेले वैशिष्ट्यपूर्ण संपूर्ण पोषण समाधान आहे, ज्यातून कांद्याच्या पिकासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक जसे कि मुख्य, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये पुरविली जातात. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी या खताला भरभरून दिलेला प्रतिसाद पाहता हे खत शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरल्याची प्रचिती येते. 'महाधन क्रॉपटेक' ही भारतातील अग्रणी खत उत्पादकांपैकी एक असून दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएफपीसीएल) ची सार्वजनिक मालकी असलेली कंपनी आहे, गेल्या तीन वर्षात सुमारे ४५० पेक्षाही अधिक घेतलेल्या चाचण्यांच्या माध्यमातून व ५००० पेक्षा जास्त प्रात्यक्षिकातून त्याची शेतकऱ्यांसाठीची उपयुक्तता निर्विवादपणे सिध्द झाली आहे. कांद्याचे प्रगतीशील शेतकरी श्री. विलास शहाजी शेवाळे (गाव - टाकळी, ता.- अकोले, जि.- अहमदनगर) हे 'महाधन क्रॉपटेकच्या' वापरामुळे मिळालेल्या फायद्याला आनंदाने दुजोरा देताना म्हणतात की रब्बी हंगाम २०२२ मध्ये मी माझ्या शेतामध्ये कांदा पिकावर क्रॉपटेक खत वापरले. या खतामुळे मला मोठे आणि एकसमान आकाराचे कांदे मिळाले परिणामी मला एकरी २.५ टन उत्पादन जास्तीचे मिळाले. तसेच कांदा चाळीमध्ये जवळजवळ ६ ते ७ महिने चांगला टिकून राहिला,

कांद्याची प्रत चांगली मिळाल्यामुळे बाजारभाव देखील खूप चांगला मिळाला. *महाधन कंपनीचे चिफ ऑपरेटींग ऑफीसर श्री. नरेश देशमुख, म्हणाले की* मला ही गोष्ट सारखी मनाला बोचत होती की रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे भारतातील जमिनीचे आरोग्य मोठ्या प्रमाणात बिघडले असून तिचा सातत्याने ऱ्हास होत आहे व याला काही चांगला पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे फार आवश्यक आहे. याचाच परिपाक म्हणून महाधन या सारख्या लोकप्रिय खतकंपनीने या संदर्भात जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान भारतातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांनी काळाची गरज ओळखून अशा प्रकारच्या उत्पादन वापराकडे तातडीने वळले पाहिजे. म्हणूनच कांद्याच्या पिकाची उत्पादनक्षमता वाढविण्याबरोबरच निसर्गाला हानी न पोहोचवणारे उपाय उपयोगात आणण्याची तातडीची गरज आहे. यामुळे मुख्य, दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या वापराचा समतोल साधला जाईल.

# दबावतंत्राच्या विचारधारेविरोधात राष्ट्रवादी खंबीरपणे उभा : रोहिणीताई खडसे

**सातारा :** राज्यात भाजपने फोडाफोडीचे राजकारण करून वातावरण गढूळ केले आहे. मात्र दबावतंत्राच्या या विचारधारेविरोधात राष्ट्रवादी खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे स्वकियांपेक्षा भविष्यात आमच्यासमोर या भ्रष्ट जुमला पार्टीचेच आव्हान असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या प्रदेश अध्यक्षा रोहिणीताई खडसे यांनी केले.

सातारा येथे राष्ट्रवादी भवनात महिला कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी रोहिणी खडसे आल्या होत्या. तत्पुर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील माने, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा प्रा. कविता म्हेत्रे, समिंद्रा जाधव, राजकुमार पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी रोहिणी खडसे म्हणाल्या, देशात व राज्यात भाजपाकडून फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. अनेक नेते पक्ष सोडून जात आहेत. दबावतंत्राच्या या विचारधारेविरोधात राष्ट्रवादी खंबीरपणे उभा आहे. मोदी सरकारविरोधात खा. शरद पवार, खा. सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्यासह सर्व राष्ट्रवादीच्या नेत्यांचे दौरे सुरू असल्याचे खडसे म्हणाल्या.

खडसे पुढे म्हणाल्या, माझी नियुक्ती झाल्यानंतर राज्याचा दौरा केला आहे. यादरम्यान महागाई, बेरोजगारीमुळे महिलांमध्ये नाराजी असल्याचे दिसून आले. राज्यात महिला सुरक्षित नाहीत. अत्याचाराच्या घडल्या तरी कार्यवाही होत नाही. देशातही अशीच परिस्थिती आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील महिला मल्लांना पारितोषिक परत करावे लागणे, हे दुर्दैवी आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस महिलांमध्ये अंतर्गत वाद नाहीत. मतभेद असू शकतात, परंतु, मनभेद नाहीत. पक्षात मत व्यक्त करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. हा पक्ष लोकशाहीनुसार चालतो. कार्यकर्त्याला बोलण्याची संधी दिली जाते. इतर पक्षांमध्ये दबावतंत्र वापरले जाते, कार्यकर्त्याला बोलू दिले जात नाही, तशी परिस्थिती राष्ट्रवादीत नाही. गेल्या दहा वर्षाची आकडेवारी पाहता भाजपाच्या काळात सर्वात कमी महिला लोकप्रतिनिधी निवडून गेले आहेत. परंतु, राष्ट्रवादी पक्षातून जास्तीत जास्त संधी देण्यात येणार असल्याचे खडसे यांनी सांगितले.

# शासनाने इतकेही असंवेदनशील बनू नये : सौ.सत्वशीला चव्हाण

**सातारा :** सातारा जिल्हा परिषदेच्या समोर राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालीका कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. वेतनवाढ व खाजगी कंपनीचा कंत्राटी कर्मचाऱ्यांना होणारा त्रास या बाबत आंदोलन सुरु आहे. राज्यातील जवळपास २० हजार कर्मचाऱ्याचा हा प्रश्न असून याबाबत वेळोवेळी आंदोलकांनी आंदोलन केले आहे. या प्रश्नावर सुनीता आमटे यांनी नागपूर येथे अधिवेशन काळात आंदोलन करीत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला त्यानंतर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या जळगाव येथील घरासमोर सुद्धा आंदोलन केले पण शासनाने कोणतीही दखल न घेतल्याने स्वराज्याची राजधानी असलेल्या साताऱ्यात तरी आपल्याला न्याय मिळेल म्हणून आंदोलनकर्त्या सुनीता आमटे सातारा जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करीत आहेत. गेले नऊ दिवस अन्न पाणी न घेतल्याने त्यांची प्रकृती अतिशय गंभीर झाली. पण तरीसुद्धा प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही.

उलट हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला गेला. या आंदोलनाची व तेथे उपोषण करणाऱ्या उपोषणकर्त्यांची माहिती माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्या पत्नी सौ. सत्वशीला चव्हाण यांना समजताच त्या तातडीने आंदोलन स्थळी येऊन आंदोलनकर्त्यांची विचारपूस केली तसेच सुनिता आमटे यांच्या तब्येतीची चौकशी करून त्यांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना तिथूनच संपर्क साधून आंदोलनकर्त्या सुनीता आमटे यांच्यावर उपचार सुरू करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी काँग्रेस पदाधिकारी सुषमा राजेघोरपडे, वैशाली जाधव आदी उपस्थित होते. यावेळी माध्यमांशी बोलताना सौ. सत्वशीला पृथ्वीराज चव्हाण म्हणाल्या की, गेले नऊ दिवस झाले ग्रामपंचायत संगणक परिचालीका कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू आहे तरी शासन त्यांची किंचित सुद्धा दखल घेत नाही ही अत्यंत असंवेदनशील बाब आहे.

आंदोलनकर्त्या सुनीता आमटे या आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख असल्याने त्या नेटाने त्यांच्या मागण्यांची लढाई लढत आहेत परंतु नऊ दिवस अन्न पाणी न घेतल्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर झाली आहे. अशा परिस्थितीत सुद्धा शासन जर दखल घेत नसेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. यावरूनच राज्यात असलेले खोके सरकार सामान्य नागरिकांच्या प्रश्नाबाबत किती गंभीर आहे व किती असंवेदनशील आहे हे दिसून येते.

राज्यातील आंदोलनकर्त्यांना न्याय मिळावा यासाठी सौ आमटे यांनी वेळोवेळी आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले परंतु त्यांना निराशाच पदरी पडली. त्यामुळे आपल्याला स्वराज्याची राजधानी असलेल्या साताऱ्यातच न्याय मिळेल या अपेक्षेने साताऱ्यात येऊन आंदोलनकर्ते आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन शासनाने तातडीने त्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करावी.